बिबट्या/चोर/दरोडेखोर यांचेपासून आपले व कुटुंबाचे संरक्षण करा
बंदूक घर
१ किमी पर्यंत मोठा आवाज
लायसेन्सची आवश्यकता नाही
सर्व प्रकारच्या स्वरक्षणाच्या अत्याधुनिक ॲक्सेसरीज
9890897472
9225311313
शहीद स्मारक बंदूक मिळेल.
संगमनेर रोड, फॉल्कॉन हेल्थ क्लब शेजारी, श्रीरामपूर

नवी आशा नवी दिशा
सार्वमत

ACC cement
सुरक्षा सिमेंट
कॉक्रीटप्लस सिमेंट
गोल्ड शिल्ड सिमेंट
राहुरी तालुक्यात कोठेही फक्त ५० बॅग सुद्धा पोहोच मिळतील.
आणि संपुर्ण जिल्ह्यात कोठेही १०० बॅग सुद्धा पोहोच मिळतील.
सर्व प्रकारचे बांधकाम साहित्य आणि होमडेकोर चे साहित्य एकाच छताखाली.
हरीष एजन्सीज
राहुरी खुर्द, राहुरी, जि. अहिल्यानगर.
Contact - 7410717241 / 9370319458

अहिल्यानगर | अंक १४२ | वर्ष ५० वे | शुक्रवार, १३ जून २०२५ | पाने १२ | किंमत ₹ ६

विमान डॉक्टरांच्या वसतीगृहावर कोसळले

गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणींचं निधन

अहमदाबाद– अहमदाबाद विमानतळाजवळील मेघानी परिसरात काल १२ जून २०२५ रोजी दुपारी एअर इंडियाचे विमान कोसळले. हे विमान लंडनकडे जात होते आणि टेक ऑफ केल्यानंतर अवघ्या काही काळातच ते कोसळले. या विमानात दोन पायलट आणि १० क्रू मेंबर्ससह एकूण २४२ प्रवासी होते. या विमान अपघातात एक प्रवासी वगळता सर्व प्रवासी ठार झाल्याची शक्यता वर्तवली जात आहे. टेक ऑफनंतर विमान सुमारे ६०० फूट उंचीवर गेले आणि त्यानंतर काही क्षणांतच हे विमान बी. जे. मेडिकल कॉलेजच्या हॉस्टेलवर कोसळले, त्यामुळे तिथे उपस्थित असलेल्या लोकांनाही इजा झाली. या दुर्घटनेत गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी यांचेही निधन झाले. **(पान ६ वर)**

७ मराठी प्रवाशांचा मृत्यू

राष्ट्रवादीचे नेते खासदार सुनिल तटकरे यांच्या भाच्याची पत्नी अपर्णा महाडिक या देखील एअर इंडियाच्या क्रूमध्ये होत्या. विमानातील क्रू मेंबर्सची नावे आली आहेत. यामध्ये क्लाईव्ह कुंदर–फर्स्ट ऑफिसर, सुमित सबरवाल, अपर्णा महाडिक, श्रद्धा धवन–केबिन एक्झिक्युटिव्ह १, दीपक पाठक–केबिन एक्झिक्यूटिव्ह २, इरफान शेख, नंथेम सिंगसेन, मैथिली पाटील असे आठजण होते. यापैकी अपर्णा महाडिक या तटकरे यांच्या नात्यातील आहेत. महादेव पवार, आशा पवार, मयूर पाटील, दीपक पाठक, रोशनी सोंघरे हेही या विमानात होते.

डॉक्टरांच्या ताटातला घास अर्धवट राहिला...

दुपारी १ वाजून ३८ मिनिटांनी विमानाने टेक–ऑफ केले. त्यानंतर काहीच मिनिटांत ते कोसळले. एनआयने दिलेल्या माहितीनुसार हे विमान डॉक्टरांच्या वसतीगृहावर कोसळले आहे.

यावेळी डॉक्टर आणि विद्यार्थी दुपारच्या जेवणासाठी कँटिनमध्ये बसले होते. भरल्या ताटावरच त्यांच्या समोर मृत्यू उभा राहिला. मृतांमध्ये डॉक्टर आणि विद्यार्थी असण्याचीही भीती वर्तवली जात आहे. वसतीगृहाच्या इमारतीमध्ये हे विमान भिंतींना भगदाड पाडून घुसले. अनेक खोलीच्या भिंती, खांब, छपर पडले असून ही इमारत धोकादायक स्थितीत आहे. घटनेनंतर काही वेळातच विद्यार्थ्यांना तात्काळ बाहेर काढण्यात आले.

२४१ प्रवाशांचा मृत्यू

महिलेचे शीर रस्त्यावर पडले, बघ्यांनी चक्क फोटो आणि सेल्फी काढले

अपघातग्रस्त स्थळावरुन अनेक फोटो, व्हिडिओ समोर येत असतानाच आता असा एक व्हिडिओ व्हायरल होत आहे जो पाहुन माणुसकीच मेली असं म्हणायचं का? असा प्रश्न उपस्थित आहे. कारण, विमान कोसळलं त्या ठिकाणाहून अवघ्या काही अंतरावर एका महिलेचे शीर रस्त्यावर पडलेले दिसून आले. या ठिकाणी बघ्यांनी एकच गर्दी केली इतकेच नाही तर उपस्थितांनी त्याचे फोटो आणि सेल्फी काढण्यास सुरुवात झाली.

डॉक्टर दाम्पत्यासह तीन मुलांचा मृत्यू

राजस्थानातील बांसवाडा येथील डॉ. कोनी व्यास, त्यांचे पती डॉ. प्रदीप जोशी, मुले प्रद्युत जोशी, मिराया जोशी आणि नकुल जोशी यांचाही विमान अपघातात मृत्यू झाला. उदयपूर येथील पॅसिफिक हॉस्पिटल उमरदाच्या व्यवस्थापनाने सांगितले की, डॉ. कोनी व्यास यांनी महिनाभरापूर्वी येथील नोकरी सोडली होती. त्या त्यांच्या पतीसोबत राहण्यासाठी लंडनला जात होत्या, म्हणून त्यांनी राजीनामा दिला.

अपघातामध्ये एक प्रवासी बचावला!

हा अपघात इतका भयानक होता की त्यामध्ये सर्व प्रवाशांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त करण्यात येत होती. अहमदाबादच्या पोलीस संचालकांनी देखील ही भीती व्यक्त केली होती. पण, त्याचवेळी चमत्कार घडला आहे. या अपघातामध्ये एक प्रवासी बचावला आहे. रमेश विश्वास कुमार असं या अपघातामध्ये वाचलेल्या एका प्रवाशाचं नाव आहे. ते या विमानात ११ – या सीटवर बसले होते. 'देव तारी त्याला कोण मारी' या म्हणीचा अनुभव त्यांना आला आहे.

बिल दाखवल्यानंतर साई मंदिरात पूजेचे साहित्य नेण्यास परवानगी

भाविकांची लूट थांबवण्याकरता संस्थानचा निर्णय

शिडी (प्रतिनिधी)– काश्मीर येथील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय दर्जाचे तीर्थक्षेत्र म्हणून समजल्या जाणाऱ्या साईनगरीत साईभक्तांना साई समाधी मंदिरात फुलं–हार व प्रसाद नेण्यास बंदी करण्यात आली होती. मात्र गुरुवारी १२ जून रोजी साईबाबा संस्थानच्या तदर्थ समितीने फुलं–हार व प्रसाद बंदीचा निर्णय घेतला असून भाविकांची लूट थांबवण्याकरिता पूजेचे साहित्य खरेदी केल्याची पावती प्रवेशद्वारा जवळ दाखवल्यानंतरच साई भक्तांना फुलं हार, प्रसाद नेण्यास मंदिरात परवानगी मिळणार आहे. या निर्णयाचे साईभक्त व ग्रामस्थांनी स्वागत केले आहे.

करोना काळात साई मंदिरात फुलं–हार व प्रसाद बंदी केल्यानंतर दोन ते तीन वर्ष शिर्डीतील फुल विक्रेते व परिसरातील फुल उत्पादक यांना आर्थिक वर्षाचा मोठा सामना करावा लागला होता. **(पान ६ वर)**

शाळा आता सकाळी ७ ऐवजी ९ वाजता सुरू होणार

मुंबई– पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वाची सूचना समोर आली आहे. महाराष्ट्रातील शाळा नव्या शैक्षणिक वर्षासाठी १६जून २०२५ पासून सुरू होणार आहेत. पालक आणि विद्यार्थ्यांनी शाळेच्या तयारीला वेग दिला असून नव्या शालेय साहित्याची खरेदी देखील सुरू केली आहे. या दरम्यान एक मोठी बातमी समोर आली आहे. यंदा शाळांच्या वेळापत्रकात मोठा बदल करण्यात आला आहे. आता शाळा सकाळी ७ ऐवजी ९ वाजता सुरू होणार आहेत.

महाराष्ट्र बोर्डाच्या शाळांसाठी नवे नियम

महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाने शैक्षणिक वर्ष २०२५–२६ साठी शाळांच्या वेळा बदलण्याचा निर्णय घेतला आहे. यंदा १६ जूनपासून सुरू होणाऱ्या शाळा सकाळी ९ वाजता सुरू होऊन सायंकाळी ४ वाजता सुटतील. **(पान ६ वर)**

नव्या वेळापत्रकाचा तपशील

- नव्या वेळापत्रकानुसार, शाळा सकाळी ९ वाजता सुरू होईल. पहिल्या १५ मिनिटांत म्हणजे ९:०० ते ९:२५ पर्यंत प्रार्थना आणि परिपाठ होईल. त्यानंतर ९:२५ ते ११:२४ पर्यंत पहिल्या तीन तासिका (लेक्चर्स) होतील. ११:२५ ते ११:३५ या वेळेत १० मिनिटांची छोटी सुट्टी असेल. ११:३५ ते १२:५० पर्यंत पुढील दोन तासिका होतील. १२:५० ते १:३० पर्यंत मध्यान्ह सुट्टी असेल. त्यानंतर १:३० ते ३:५५ पर्यंत उर्वरित तासिका होतील. शेवटच्या ५ मिनिटांत राष्ट्रगीत आणि इतर समारोपाचे कार्यक्रम होऊन शाळा सुटेल.

जमिनीसाठी अकारी पडीत शेतकरी आक्रमक पोलिसांनी केले अनेक शेतकऱ्यांना स्थानबद्ध

शिरसगाव/खैरी निमगाव (वार्ताहर)– आमच्या जमिनी आम्हाला दिल्यानंतर शेती महामंडळाच्या शिल्लक जमिनी निविदा पध्दतीने देण्यात याव्यात, अशी मागणी अकारी पडीत शेतकऱ्यांची असताना तालुक्यातील एकवाडी, पाचवाडी हद्दीत मुठेवाडगाव रोडलगत शेती महामंडळाने त्यांच्या हद्दीतील वेड्या बाभळी, काटे, झाडे काढण्याचे काम निविदाद्वारे एका ठेकेदाराला दिले. जेसीबी मशिनच्या साह्याने काट्या, झाडे काढण्याचे काम सुरु झाले. परंतू त्यास परिसरातील अकारी पडीत शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला. हरेगाव–ब्राम्हणगाव फाटा जवळील शेती महामंडळ कार्यालयाजवळ २०० शेतकऱ्यांनी उग्र आंदोलन पुकारले. शेवटी पोलीस प्रशासनाने शेतकऱ्यांना स्थानबध्द करण्याची कारवाई केली.

अकारी पडीत शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी परत केल्याशिवाय शेती महामंडळाच्या जमिनी निविदा पद्धतीने कोणाला देऊ नये, अथवा सार्वजनिक कामासाठी सुद्धा देऊ नये, अशी मागणी अकारी पडीत शेतकऱ्यांनी याअगोदर केली आहे. त्यासंदर्भात उच्च न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यासाठी अनेकवेळा अकारी **(पान ६ वर)**

जलजीवनच्या कामावरुन दोन नवले एकमेकांना भिडले

श्रीरामपूर (प्रतिनिधी)– शासनाच्या जलजीवन मिशन अंतर्गत सुरु असलेल्या भेर्डापूर येथील पाणीपुरवठा योजनेच्या कामावरुन काल बाजार समितीचे सभापती सुधीर नवले व माजी जिल्हा परिषद सदस्य शरद नवले यांच्यात पंचायत समितीत गटविकास अधिकाऱ्यांच्या दालनात चांगलीच हमरी–तुमरी झाली. त्याचे रुपांतर धक्काबुक्कीपर्यंत गेले. शेवटी प्रकरण पोलीस ठाण्यापर्यंत आले. मात्र काहींनी मध्यस्थी करुन दि. १६ जून रोजी सामंजस्याची बैठक आयोजित करण्याचे ठरले. त्यामुळे या वादावर तात्पुरता पडदा पडला आहे.

गेल्या महिनाभरापूर्वी भेर्डापूर येथील महिलांनी जल जीवन मिशनअंतर्गत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनेच्या कामाच्या दर्जाबाबत तसेच पाण्याच्या समस्येबाबत बाबासाहेब पवार यांच्या नेतृत्वाखाली उपोषण केले होते. योजनेच्या निकृष्ट दर्जाबाबत आणि अपूर्ण कामामुळे पाणीपुरवठा न झाल्याने ग्रामस्थ संतप्त झाले. ठेकेदाराने काम लवकर पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, महिन्यानंतरही कामात कोणतीही सुधारणा न झाल्याने पुन्हा ग्रामस्थांनी पंचायत समितीत धाव घेतली. काल गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे यांच्या दालनात बाबासाहेब पवार आणि काही ग्रामस्थांनी आपली व्यथा मांडली. त्याचवेळी सुधीर नवले पंचायत समितीत गेले. ते गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे यांच्याशी चर्चा करीत असताना शरद नवले तिथे आले.

यावेळी ठेकेदाराच्या भूमिकेवरून वाद पेटला. शरद नवले यांनी काम न **(पान ६ वर)**

मनपा, पालिका, नगरपंचायतसाठी प्रभाग रचनेचे वेळापत्रक जारी

प्रभाग रचना सप्टेंबरपर्यंत पूर्ण होणार, २२ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर दरम्यान अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध होणार

मुंबई (प्रतिनिधी)– राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी प्रभाग रचनेचे आदेश निघाल्यानंतर गुरुवारी नगर विकास विभागाने मुंबईसह ठाणे, नाशिक, पुणे अशा २९ महापालिका तसेच नगरपरिषद आणि नगर पंचायतच्या प्रभाग रचनेचे प्रारुप तयार करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम घोषित केला. त्यानुसार २२ ऑगस्ट २०२५ ते ४ सप्टेंबर २०२५ या दरम्यान अंतिम प्रभाग रचना अधिसूचनेद्वारे प्रसिद्ध करावी लागणार आहे. वेळापत्रकानुसार कार्यवाही पूर्ण करण्याचे आदेश राज्यातील महापालिका आयुक्त, जिल्हाधिकारी, नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या मुख्याधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने चार महिन्यांत स्थानिक **(पान ६ वर)**

ड वर्ग महापालिका, नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या प्रभाग रचनेचे वेळापत्रक

११ ते १६ जून : प्रगणक गटाची मांडणी
१७ ते १८ जून : जनगणनेची माहिती तपासणी
१९ ते २३ जून : स्थळ पाहणी करणे
२४ ते २६ जून : गुगल मॅपवर प्रभागाचे नकाशे तयार करणे
२७ ते ३० जून : नकाशावर निश्चित केलेल्या प्रभाग हद्दींची जागेवर जाऊन तपासणी
१ ते ३ जुलै : प्रभाग रचनेच्या मसुद्यावर समितीने सह्या करणे
४ ते ८ जुलै : प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव निवडणूक आयोगाला पाठवणे
१५ ते २१ जुलै : प्रारुप प्रभाग रचना प्रसिद्ध करणे, त्यावर हरकती आणि सूचना मागवणे
२२ ते ३१ ऑगस्ट : हरकतींवर सुनावणी घेणे
१ ते ७ ऑगस्ट : हरकती आणि सूचनांवरील शिफारशी विचारात घेऊन अंतिम प्रभाग रचना निवडणूक आयोगाला पाठवणे
२२ ऑगस्ट ते १ सप्टेंबर : आयोगाने अंतिम केलेली प्रभाग रचना अधिसूचनेद्वारे प्रसिद्ध करणे

अन्य पानात

नेवासा, पाथर्डी, शेवगाव, नगरला तुफानी पाऊस
बुधवारच्या वादळात एकाचा मृत्यू; १५६ घरांची पडझड, तिघे जखमी
शेवगाव : बैलगाडीवर झाड पडल्याने वृध्द महिलेचा मृत्यू
पाच तालुक्यातील ९७ गावांत वादळामुळे दणका ९९५ शेतकऱ्यांचे ५६७ हेक्टरवरील पिकांचे नुकसान
आठवडाभर पावसाचा जोर राहणार
श्रीरामपुरातही मुसळधार
भंडारदरातही जोरदार पाऊस

www.zalimlotion.in
जालिम लोशन
ZALIM LOTION
For Ringworm and Itches
दाद, खाज, खुजली आणि एक्झीमासाठी
आजच मेडिकलमधुन खरेदी करा.
E-mail for Dealership at zalimlotion1929@gmail.com
ANIL PUB.